# शब्दबंध

संगीता कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# शब्दबंध

(काव्यसंग्रह)

कवयित्री : संगीता कुलकर्णी

# शब्दबंध( काव्यसंग्रह)


## कवयित्री : संगीता कुलकर्णी

C/O- आशिष कुलकर्णी
४३/A मयुरेश्वर साई निसर्ग पार्क पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७
Mob: 9850996264



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेच्या वारसांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604

Whatsapp: 9987737237

प्रकाशन: ३१ डिसेंबर२०२१

(मार्गशीर्ष व. द्वादशी शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

विशेष आभार

**या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य ई वितरण करण्याची परवानगी दिल्याबद्दल**

**पृथ्वीराज प्रकाशन**

गांधीभवन, कोथरूड, पुणे ४११०३८

तसेच या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी सर्व प्रकारची मदत करणाऱ्या

**सौ. शुभांगी महेकर आणि अंजना लगस**

यांचे मनःपुर्वक आभार

ई साहित्य प्रतिष्ठान

# शब्दबंध

संगीता कुलकर्णी



संगीता कुलकर्णी ह्यानी कुठल्याही विद्यापीठाची पदवी किंवा लेखनाचे औपचारिक शिक्षण घेतले नव्हते. आयुष्यातील अनेक चढ उतार आणि अडथळ्यांमुळे तशी संधीच मिळाली नाही. पण उपजतच असलेली भाषेची, संगीताची आवड, जाण, सकारात्मक वृत्ती ह्यातून त्यांचं लेखन निर्माण झालं. ऑफिस आणि घर हेच त्यांचं विश्व होतं. मुलं, सुना, नातवंडं, भावंडं, मित्र आणि परमेश्वर हे त्यांच्या लेखनाचे विषय होते. साधे सोपे शब्द व उपमांमधून त्यांनीं जीवनाचं सार सांगितलं.

परिस्थितीशी झगडत,आयुष्याला स्वीकारून, कर्तव्य करत, कुटुंबावर निस्सीम प्रेम करत शब्दात रमलेली आणि जगलेली शब्दप्रिया म्हणजे संगीता कुलकर्णी !

(जन्म 1950 , मृत्यू 2019 )

जन्मभर ज्यांच्या प्रेमामध्ये मी बांधली गेलेय

अशा माझ्या लाडक्या पाच बहिणी व प्रिय भाऊ प्रकाश

यांना सादर ....

--- संगीता

# मनोगत

असे म्हटले जाते की, माणूस आपल्या आयुष्यातील “पहिले प्रेम” कधीही विसरत नाही आणि ते खरेही आहे. पहिली प्रीती त्यामुळे निर्माण झालेले नाजूक ऋणानुबंध, त्याची तहहयात जाणवणारी मृदू बांधिलकी मनाला आयुष्याच्या कोणत्याही वळणावर भुरळ घालते. उर्वरित सारे जीवन त्या सुंदर तरल – स्मृतींवर सहजी सुरस बनते. मी देखील हे मृदुबंध माझ्या मनाच्या गाभाऱ्यामध्ये अत्यंत हळुवारपणे साठवून ठेवले आहेत, की ज्यायोगे आजवरचे जीवन सुरस नव्हे तर सुरम्य नादमयच बनून राहिले आहे. आता अधिक न ताणता मी सांगूनच टाकते ही माझी प्रेमकहाणी. माझी पहिली प्रीती शब्दांशीच जडली जी आजवरच नव्हे, तर आजन्म निःसंशय चिरतरुण राहील. हे शब्दबंध मला माझे सारे आयुर्मान सरेतो प्रिय आहेत.

माझ्या जीवनामध्ये यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. वेळ आलीच तर मी काहीही सोडेन पण शब्दबंध अंह, मुळीच नाही. कोट्यावधींची संपत्तीही यापुढे शून्यवत आहे. अमोल असे शब्दसामर्थ्य मला नेहमीच मोहवून टाकते नि मी त्यांची कधी, कशी अंकित होऊन जाते ते माझे मलाही कळत नाही. शब्दबंधांच्या पाशामध्ये मी एवढी जखडून जाते की त्यातून दूर होणे ही केवळ कल्पनाही दुरापास्त आहे. याच्या नादमाधुर्याने माझे अवघे जीवन गेय बनलेच आहे. याच गेयतेमध्ये तल्लीन होऊन माझे नित्यक्रमही तालबद्ध होतात. याच्याच तालावर मला जीवनाचे सौंदर्य भेटते नि जीवनाकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी लाभते. याच्यामुळे आलेले मनमोहक अनुभव, अविस्मरणीय व्यक्ती मी नकळत काव्यबद्ध करते नि म्हणूनच या

अतूट बंधनाची मी आजन्म ऋणीच राहीन. असे हे जीवनाचे सुरेल रूप, काव्यमय रंगातून व्यक्त करणारे शब्दबंध मजसाठी अनुपमेयच आहेत. ज्यांच्यामुळे मला नित्यनूतन जगण्याची ऊर्जा, ऊर्मी लाभते. तुम्हीही हे अनुभवा, तुम्हालाही लाभेल खचित; म्हणून हे रसिक वाचका, तुझ्यास्तव शब्दप्रियेचे हे व्दितीय शब्दरूप सादर समर्पण.

शब्दबंध हळुवारपणे उलगडत असताना मला अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभले. माझे दोन पुत्र व दोन स्नुषा यांचे मोलाचे प्रोत्साहन माझ्यासाठी फारच मौल्यवान आहे. त्यांच्याच स्नेहाखातर मी हे लेखनधाडस करू धजले. पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, यांचे संचालक, कवी म.भा. चव्हाण यांचे मार्गदर्शन व सक्रिय सहभाग असल्यानेच शब्दबंध साकार होत आहे. इतरही असंख्यांचे कळतनकळत लाभलेले स्नेहरूप सहकार्य मजसाठी लाख मोलाचे आहे. ज्यांच्या बंधनामध्ये मी आजन्म बद्धच रहाणे पसंत करीन ते शब्दच खरे तर याचे मूर्तरूप आहेत. असाच हा "शब्दबंध" सादर समर्पण करताना मी खरोखरच कृतार्थ आहे. तृप्त आहे.

संगीता कुलकर्णी

सी ६, सुयोग – आदित्य रेसिडेन्सी,

बिबवेवाडी, पुणे – ४११०३७

फोन : (०२०) २४२१२२७८

# शब्दबंध : गोकुळ गोतावळ्यातील कविता

संगीता कुलकर्णी शब्दबंध हा परस्परांवरील विश्वासाचा, प्रेमाचा आणि नातेसंबंधांचा कौटुंबिक अनुबंध आहे.

भारतीय संस्कृतीत सर्वात सुंदर काय आहे तर ती आहे कुटुंबसंस्था. तिच्याएवढं सुंदर जगात काही नाही. सांयकाळी घराच्या ओढीनं माणसं परततात. शहरातले सगळे रस्ते घराकडेच जातात, शेतातल्या पायवाटा गावाकडे जातात, पक्षी घरट्यात विसावतात. कदाचित नद्यादेखील तिकडेच जात असतील.

निद्रा, धुंदी किंवा सुप्ती

कवितेवाचून साधत नाही

आजन्माची अशी समाधी

खोड जिवाची जातच नाही ...!

कविता ही जिवाला जडलेली खोड आहे, असे कविवर्य ग.दि. माडगूळकर म्हणतात. त्यांच्यासारखंच कवयित्री संगीता कुलकर्णी म्हणतात –

शब्दप्रिया म्हणतात कोणी, कोणी शब्दवेडी

शब्दातच गवसते साऱ्या विश्वाची गोडी

जगाला गोडवा शब्दांमुळे आलेला आहे. ही कल्पनाच अत्यंत आगळीवेगळी आहे.

संगीता कुलकर्णींनी जे अनुभवलं त्याच्या ओव्या झाल्या. त्यांना लेकीसुना, मुलं, नातवंडं यांच्याकडून जे प्रेम मिळालं त्याच्या त्यांनी कविता केल्या.

नातेसंबंधांना ठेवणीतल्या मोरपीसासारखं कसं जपावं याचं वर्णन त्यांच्या अनुबंधांतून अधोरेखित झालेलं आहे.

सुख दुःखांच्या कथा ऐकत इथवर आपण आलो

नि परस्परांना सावरताना एकरूपही झालो

तुझ्या माझ्या मनीच्या जुळुनी आल्या तारा

हसतखेळत पाहता पाहता संसार आला बहरा ...

या आणि अशाच प्रपंचगीतांची मालिका संग्रहात अव्याहतपणे पुढे सरत आहे.

प्रेमी जनांची सलज्ज कुजबुज, निसर्गाचे गूढ, मधुर गुज या संग्रहात शब्दबद्ध झालेले आहे.

ईश्वरशक्तीचा सहज सुंदर अविष्कार संगीता कुलकर्णींच्या भक्तीगीतांतून आपल्यासमोर साकार होतो.

निजभक्तांच्या भोळया प्रेमापोटी

नित उभा असे सदोदित जगजेठी

किंवा

करुणाघन हे करुणाई

स्नेहसुधा हे ममताई

विठाई गं विठाई

धावा, स्तवन इत्यादी कवितांमधून गणपती, तुळजापुरवासिनी यांच्या कविता भाविकांना नक्कीच आवडतील.

हा हसरा भावंडांचा मेळा

मुलानातवंडांचा गोकुळ गोतावळा

चिल्यापिल्यांचा लळा असणारी ही कवयित्री लहानांना आणि मोठ्यांना आवडतील अशा मोहमयी कविता लिहिते.

पाऊ रे पाऊ

नको ना सारखा येऊ ...

किंवा

पिल्ली माझी ही मोठी व्हायची

सोनी माझी ही मोठी व्हायची

किंवा

मनु रे मनु, तुला काय म्हणू ?

अवखळ चंचल वाराच जणू

या अगदी खासुमखास कविता आहेत. कृतार्थ, माझा गाव, पाश, सांत्वन, टिंगल, जीव, क्षणिक, रसिक इत्यादी कविता मला जीवनभर सार्थ भाष्य करतात म्हणूनच आवडल्या.

कवयित्री संगीता कुलकर्णी या गोकुळ गोतावळ्यातल्या कवयित्री आहेत. भरल्या घरातलं भरलेपण त्यांच्या शब्दांतून ओसंडत असते. सुनेला मुलगी मानणारी सासू, सासूला आई मानणाऱ्या सुना जिथे असतील तिथे रितेपण कसं असणार? कुणालाही आवडेल असाच त्यांच्या कवितांचा पोत आहे.

भाव मनीचे मोती बनले

शब्दबंध माला गुंफिती

बंध तरल हे आयुष्याचे

रूप सरल हे मम आत्म्याचे

शब्दांवर प्रेम करणारी ही कवयित्री अतिसंवेदनशील आहे. कधी कधी संगीता कुलकर्णींबरोबर शब्द नाचत असतात की त्या शब्दांबरोबर नाचत असतात काहीच कळत नाही.

एकदा पुस्तक हातात घेतलं की त्याच बैठकीत रसिक हा 'शब्दबंध' वाचून संपवतील.

मराठी मातीची ही कविता अस्सल आहे आणि जे अस्सल असतं तेच मराठी माणूस आपलं मानतो. याची साक्ष भीमा, कृष्णा आणि गोदावरी देतील. संगीता कुलकर्णींची कविता प्रत्येकाला आपली वाटेल. त्यांच्या कवितांचे सर्वत्र स्वागतच होईल अशी मला खातरी आहे.

त्यांना आभाळभर शुभेच्छा ...!

कवि म.भा. चव्हाण

गांधीभवन, कोथरूड, पुणे ४११०३८

## अनुबंध


१ धावा
२ पश्चाताप
३ स्पर्श तुझ्या शब्दांचा
४ प्रपंच
५ मन माझे
६ आतूर
७ जगजेठी
८ महती
९ अंतर
१० निष्ठा
११ दुरावा
१२ तरीही जगणे आहेच
१३ गाव माझा
१४ पाश
१५ सुयश
१६ नतमस्तक
१७ वर्षारंभ
१८ पाऊ
१९ माहेर
२० आस
२१ संचार
२२ सासूबाई
२३ पाझर
२४ शुभेच्छा
२५ सांत्वन
२६ टिंगल
२७ बढती
२८ क्षणिक
२९ तुला सोडून
३० धमकी
३१ पिल्ली
३२ डोळे
३३ रसिक
३४ शब्दवेडी
३५ संवाद
३६ जीवनाचे सार
३७ स्नेहबंध
३८ कृतार्थ
३९ सोहळा
४० याचना
४१ मनु रे मनु
४२ सदाफुली
४३ आर्जव
४४ वांछित
४५ गे प्रिये
४६ एक नजर
४७ जीव
४८ शब्दबंध
४९ स्तवन
५० आनंद
५१ नर्तन
५२ जो जो बाळा
५३ मेघांनो

## धावा

हेरंबा हे गजवदना
विघ्नहरा, जगतजीवना
मोरया रे मोरया

विद्यापती मंगलमूर्ती
कार्यारंभाची स्फूर्ती
येई येई सुखवाया
मोरया रे मोरया

गणनायक तू गणपती
त्रैलोक्याचा अधिपती
शिवनंदन हे सिद्धीपती
येई जगता ताराया
मोरया रे मोरया

मी अल्पमती पामर
मुखी तव नामाचा गजर
ये धावुनी तू सत्वर
आशीर्वच आम्हा द्याया
मोरया रे मोरया

# पश्चाताप

सुजलाम् सुफलाम् भूमधून माझ्या
सोन्याचा म्हणे धूर निघायचा
उत्तुंग हिमालयाचा वारा
ऐक्याची धून सर्वदूर वहायचा

राष्ट्रभक्तांकडून या भूमीला
राष्ट्रप्रेमाचा अभिषेक व्हायचा
नि धर्मप्रेमाखातर कोणी विवेकानंद
समुद्रापार पताका फडकवायचा

अशा या देशी जन्मल्याचा
प्रत्येकालाच अभिमान वाटायचा
पण आजचा दिवस मात्र आहे
हे सारे सारे आठवायचा

राष्ट्रप्रेम सरून तिथे केवळ राजकारणच उरले
नि धर्मप्रेमाचे तर इथे समाजकारणच ठरले
सदाचाराला आज इथे भ्रष्ट्राचाराने गाठले
सामन्यांचे जिणे केवळ जीवघेणेच बनले

नित्य मरता मरता इथे
झगडायचे तर आहेच
नि बदलता काहीही येत नाही
तरीही जगणे आहेच

□

## स्पर्श तुझ्या शब्दांचा

स्पर्श तुझ्या शब्दांचा
स्मृतीत माझ्या सदैव तू
कृतीत माझ्या सदैव तू
इथे तिथे तू, सभोवती तू
तनामनाला व्यापून उरला, सखया तू रे सखया तू

निरंतरी मम मनास लागे ध्यास तव दर्शनाचा
चिरंतन या नेत्रा माझ्या भास तुझ्या हास्याचा
जिवाशिवाला एकच लागे, आस तुझ्या येण्याचा
अनंताच्या पुढेही राहे, प्रयास तुझिया शोधाचा

खळखळणाऱ्या झऱ्यात गमतो, वेग तुझ्या हास्याचा
मोहविणाऱ्या सुमगंधातून आभास अस्तित्वाचा
कोसळणाऱ्या जलधारांतून वर्षाव तव स्नेहाचा
धुंदविणाऱ्या पवन घटातून स्पर्श तुझ्या शब्दांचा

डाव उधळीला संसाराचा, भोग मम प्राक्तनाचा
क्षणात गेला फसवुनी मजला साथी जीवनाचा
देणे नाही, घेणे नाही, हिशोब उरला शून्याचा
भुलवितो मना, क्षणा क्षणाला, स्पर्श तुझ्या शब्दांचा

सांगू कोणा, मागू कोणा, हट्ट करू कशाचा ?
हाती काही उरले नाही, मार्ग धरू कोणता ?
मनावरी या सदैव वाढे भार मनामनांचा
या साऱ्यातुनी सावरतो नित, स्पर्श तुझ्या शब्दांचा

□

# प्रपंच

नित्यक्रमात वावरताना तू मला भेटला
नि स्वजनांच्या साक्षीने प्रपंच आपण थाटला
नव्या नवलाईचे दिवस भुरकन कसे सरले
आपल्यालाही नकळत बघ, प्रगल्भतेने गाठले

सुखदुःखांच्या कथा ऐकत इथवर आपण आलो
नि परस्परांना सावरताना एकरूपही झालो
तुझ्यामाझ्या मनीच्या, जुळूनी आल्या तारा
हसतखेळत, पहाता पहाता संसार आला बहरा

खूप काही दिल्यानंतर थोडेफार लाभते
प्रपंचगीत गाताना हेच कळावे लागते
सद्गुणी छकुल्यांसाठी एकजीव व्हावे
अन् उत्तुंग त्यांच्या यशाखातर सदैव चालत रहावे

गोड गीत प्रपंचाचे, तालासुरात गाण्यासाठी
शब्द शब्द जपावे लागतात अर्थपूर्ण जिण्यासाठी
उन्हापावसात चालताना चल हात हाती घेऊ
सुखदुःखाला साक्षी ठेवून हसत चालत राहू

□

# मन माझे

मन सांग कुठे लपलेले ?
मन सांग कुणा दिसलेले ?
मन सांग कधी कळलेले ?
मन गोड गुपित जपलेले
मन माझे रे मन माझे

मन नित्य कुठे वसलेले ?
मन दिवास्वप्न दिसलेले
मन अंतरात हसलेले
मन एकांती रमलेले
मन माझे रे मन माझे

मन चित्त व्यथित झालेले
मन चिंतेनी थकलेले
मन वेदनेत व्याकुळलेले
मन विवंचनेत सुकलेले
मन माझे रे मन माझे
मन हास्य मुखी फुललेले

मन भाव सुखद स्फुरलेले
मन सुगंध दरवळलेले
मन गीत गुणगुणलेले
मन माझे रे मन माझे

मन तनातची दडलेले
मन तनातून फुललेले
मन तनाव्दये दिसलेले
मन तनात समरसलेले
मन माझे रे मन माझे

□

# आतूर

प्रिये तुझी प्रतिक्षा
माझी ही सत्वपरीक्षा
कशी करू समीक्षा
नव्हे ना ही उपेक्षा ?

वाटेकडे पहायचे
नाहीच तुला ते कळायचे
अंतरातून झुरायचे
दिवस कसे हे सरायचे ?

सखे तुला आठविता
मनी मानसी साठविता
रोमरोमी झंकारीता
शब्द स्फुरती सुरेल गीता

क्षणी या तू यावे
पाहुनी नेत्री मधुर हसावे
श्रावणमेघासम बरसावे
परस्परांना तृप्त करावे

आस एकली माझ्या उरी
भास सोडुनी ये सत्वरी
येशील ज्या तू प्रहरी
वसंत ऋतुची तीच फुलारी

नको पुन्हा परतोनी जाऊ
नित्य युगुलगीत गाऊ
गुण्यागोविंदे राहू
यास्तव आतूर हे बाहू

बलदंड माझ्या बाहूपाशी
आजन्म सखये तू विसावशी
स्मितांगणी जीवना फुलविशी
आतूर मी गे त्या क्षणासी

# जगजेठी

निज भक्तांच्या भोळ्या प्रेमापोटी
नित उभा असे, सदोदित जगजेठी

कुणी माना वा कोणी न माना याला
कुणी वंदा वा कोणी निंदा याला
तो सर्व करी, साऱ्या जगतासाठी

जगजीवन हा पुरुषोत्तम श्रीराम
घननीळ सखा, कृष्णरूप घनःशाम
अविरत फिरतो साऱ्या विश्वापाठी

क्षणभंगुर या नश्वर देहासाठी
सुखदुःखाच्या क्षणिक मोहासाठी
तू विसरू नको प्रभूला कोणासाठी

मद मायेने मजला ग्रासियले
क्रोध लोभाने सदैव वेढियले
मी अल्पमति जगतो कोणासाठी ?

तो खुणावतो पैलतीर मज आता
ही ओढ तुझी लागे माझ्या चित्ता
हे नेत्र खुळे अधीर भेटीसाठी
ये धावुनी ये सत्वर तू जगजेठी

□

# महती

कणखर बाण्याची, खंबीर मनाची
मजबूत बांध्याची नि तरतरीत रुपाची

पाषाणालाही बोलविणारी, रडणारालाही हसविणारी
परिस्थितीला वाकविणारी नि वातावरण चेतविणारी

हौस नटण्या मुरडण्याची, दागिने अलंकार लेण्याची
पुढे होऊन सारे करण्याची नि सुंदर जीवन जगण्याची

तत्परता सदैव हिंडण्याची, कला माणसे जोडण्याची
वृत्ती परोपकार करण्याची नि आध्यात्मा वाहून घेण्याची

आस सत्संगाची, वाणी स्पष्ट सत्य बोलण्याची
आतुरता जीवा भेटण्याची नि ओढ अंतरी मायेची

जीव असा जडवायची, नाहीच सर कोणा यायची
महती म्हणाल ही कोणाची ? माझ्या सासूआईची

नव्हता सहवास नित्याचा, स्नेह तरीही जन्मांचा
महिमा हा गोड प्रीतीचा, ठेवाच हा काकूंचा

दैवत माझ्या सासरचे, मूर्तिमंत रूप सात्विकतेचे
जे बोल दिले प्रेमाचे, सारे सारच मम जीवनाचे

□

# अंतर

स्वप्नांच्या दुनियेमध्ये वावरायचे जरूर असते
पण सत्याला मात्र कधीही विस्मरायचे नसते

स्वप्नांना सत्यामध्ये आणायचे जरूर असते
पण लाभलेल्या सत्याला नाकारायचे कधीच नसते

खूप काही पाहिलेय म्हणून सये आहे गं सांगायचे
या दुनियेमध्ये असते कसे गं राहायचे

साऱ्यांनाच सन्मानीत सदैव असते करायचे
नि आपले साम्राज्य अबाधित असते राखायचे

दुसऱ्यांना कमी लेखून कधी कोण महान बनत नसते
उलट स्वतःचेच लहानपण त्यातून उठून दिसते

असंख्य अनुभवांतून जाता जाता असते शिकायचे
साऱ्यांनाच बरोबर घेऊन सदैव पुढे जायचे

याचसाठी नित्य नेहमी हसत हसत रहायचे
मनीचे सारे गुज परस्परांशी वाटायचे

सुंदर अपुले अंतर सदैव पारदर्शक ठेवायचे
नि जे जसे लाभले, ते तसेच्या तसे स्विकारायचे

□

## निष्ठा

मायेच्या या मोहपाशातून निसटायचेय मला
शाश्वत मोक्षाप्रत जायचेय मला
साऱ्या साऱ्या सरल्यावरही उरायचेय मला
साऱ्या साऱ्या मेळ्यात राहूनही एकटे व्हायचेय मला

कैलास – मानस सौंदर्य पहायचेय मला
हिमालयाचे सान्निध्य खुळावतेय मला
आध्यात्म्याची ओढ लागली आहे मला
निसर्गातील परमेश्वर बोलावतोय मला

प्रपंचातील कर्तव्ये सोडवतही नाहीत मला
भंगूर देहाचे सोहाळे अडवतात मला
मुलाबाळातील जीव नादावतोय मला
ऐहिकाचा मोह जखडतो आहे मला

प्रभूप्राप्तीचा मार्ग कळत नाही मला
मनःशांतीची दिशा दिसत नाही मला
आत्मबोधाचे ज्ञान कसे कळत नाही मला ?
परमानंदाचा ध्यास तरीही लागला आहे मला

संसार करून परमार्थ साधायचा आहे मला
मानवातील ईश्वर पाहायचा आहे मला
कर्तव्यातच स्वर्ग शोधायचा आहे मला
नि हे सारे सारे करण्यासाठीच जगायचे आहे मला

□

# दुरावा

खूप काही सांगायचे होते, खूप काही ऐकायचेही होते
मनी लपलेले मनमुक्त बोलायचेही होते
हाती हात घेऊन दूर दूर फिरायचे होते
पावसात फिरताना सोबती चिंब भिजायचेही होते

डोळ्यांत डोळे मिसळून खोलवर पहायचे मला होते
नवीन काही आणलेले दावायचे तुला होते
कुणी काही बोललेले सांगायचेही होते
कुठे काही खुपलेले दाखवायचे तुला होते

सुंदर काही पाहिलेले नजरेतूनच वाचायचे होते
कुठे काही घडलेले तुझ्यातूनच अनुभवायचे होते
क्षण सुंदर जगलेले सजीव पुन्हा करायचे होते
सुखदुःख भोगलेले, आठवायचे पुन्हा होते

रसभरे जीवन आपुले आनंदाने बहरायचे होते
भाव मनी दाटलेले फक्त तुलाच दावायचे होते
हे करायचे होते, ते करायचे होते, खूप खूप काही करायचे होते
पण क्षणार्धात दुरावा येईल हे मला माहीत नव्हते.

## तरीही जगणे आहेच

नोकरी नाही, उद्योग नाही
बेकरीचे करावे काय ?
निरर्थक प्रश्न विचारणाऱ्या
पिढीला या म्हणावे तरी काय ?

निरुद्योगी युवा पिढीचे
आम्हीच का पालक आहोत ?
नि या भ्रष्ट राजकाणांच्या
लोकशाहीचे का मालक आहोत ?

दरवर्षी नवीन निवडणूक
मते तरी द्यावीत कोणाला ?
सारेच म्हणतात सारे करू
करत नाहीत काहीच औषधाला

निघाले आहेत विकावयाला
सुजलाम् – सुफलाम् हा देश
नि विद्वान बुद्धिमान धरत आहेत
हसत हसत परदेश

ओस पडली आहेत खेडी
वाढतोय शहरांचा पसारा
युवकांनो तुम्ही तरी
हे सारे कुठेतरी आवरा

दिसत असून सारे भोवती
आंधळे आपण सारेच
मनी असो वा नसो
तरीही जगणे आहेच

□

**गाव माझा**

करवीर धर्मपीठाचा
ताराराणीच्या कर्मपीठाचा
दक्षिण काशी मर्मस्थानाचा
गाव माझा, गाव माझा

महालक्ष्मीच्या पावन वास्तव्याचा
शाहूंच्या समानतेचा
बाजींच्या महानतेचा
गाव माझा, गाव माझा

मधु गोड गोड गुळाचा
कधी झणका जणू मिरचीचा
मूर्तीमंत संपन्नतेचा
गाव माझा, गाव माझा

पंचगंगेच्या अमृतधारांचा
शिवरायांच्या दुर्ग तटांचा
कणखर पोलादी बाण्याचा
गाव माझा, गाव माझा

हा प्रतीक माणुसकीचा
हा प्रदेश आतिथ्याचा
मृदू मुलायम मायेचा
गाव माझा, गाव माझा

माहेरच्या अतूट ओढीचा
सासरच्या गोड गोडीचा
खजिना जणू वात्सल्याचा
गाव माझा, गाव माझा

जणू स्नेह माय – पित्यांचा
मेळा मम आप्तजनांचा
बंधु नि माय – भगिनींचा
गाव माझा, गाव माझा

# पाश

चैत्रानंतर फाल्गुन न चुकता येतच राहिला
पाहता पाहता पाच वर्षांचा काळ असाच सरून गेला
तुझ्याखेरीज मी ? कसे सांगू ? काय सांगू तुला ?
हसत हसत फसवून मला, कसा तू फोटोमध्ये विसावला

आता मागे केवळ आठवणी
तुझ्या शब्दांची मनी उजळणी
तू केलेली नेत्रांनी ओवाळणी
नि मनाने केलेली आर्जवी विनवणी

मेघ येतात दाटून सभोवार आठवणींचे
न्हाऊ घालतात मनाला बोल मधाळ आर्जवांचे
सूर घुमतात मानसी, स्मृतींच्या वादनाचे
वेड लावतात जिवाला, पाश तुझ्या शब्दांचे

# सुयश

अभिनंदन कठोर परिश्रमांचे
अभिनंदन सुंदर सुयशाचे
अभिनंदन बहरण्याऱ्या कर्तृत्वाचे

नूतनमार्गी नित्य पुढे जा
दुर्धर आव्हान सामोरा जा
कठीण प्रसंगी अटल दृढ रहा
झुकल्या यशाच्या कमानी पहा

गुढी उंचवा आदर्शांची
तोरणे सजवा कर्तव्यांची
सडे शिंपडा स्वतेजांची
सार्थकता ही तव जीवनाची

या क्षणी तुला काय मी देऊ ?
नित्य उत्तुंग याशास्तव पाहू
परमेशाप्रती नित लीन राहू
आशीर्वच सदैव त्याचे मागू

## नतमस्तक

असेही जे भेटले
जिथे मस्तक नत झाले
भाव मनी दाटले
नि करही आपोआप जुळले

का नाही माहीत पण
मन वेडे पुन्हा पुन्हा तेथे येते
क्षणकाळ विसावते नि
तृप्त होऊन परतते

उत्तुंगत्व त्यांच्या ठायी खूप थिटे वाटते
सीमा नभाची अपुरी पडते
खोली दर्याचीही उणीच भासते
उंची विचारांची त्यांच्या, मना माझ्या खुणावते

दिशा पावलांची मार्गक्रमणा करते
तीर्थांचे पावित्र्य पुरेपुरे गवसते
वचन संतांचे सत्यामध्ये आकारते
नि हे, हेच ते स्थान, मन मला सांगते

दिले खूप साऱ्यांनी या भरभरून मला
घेऊ काय ? ठेवू कुठे ? उमजेच ना जिवाला
आकार दिला साऱ्यांनी या माझ्या आयुष्याला
हे एकदाच का हजार वेळा सांगेल शब्दवेडी शैला

□

# वर्षारंभ

क्षणासमान मागे ठेवून
विचार करत रहातो आपण
वर्षे कशी गेली म्हणून ?

दिवस येतात, दिवस जातात
नानाविध रंग लेऊन
जीवनाला रंगीन करतात
आपलेच रूप देऊन

कलत्या दुपारी, ढळत्या सायंकाळी
येतात साऱ्याच आतुर होऊन
जीवनाला फुलवत राहतात
हर प्रहराला, साक्षी ठेवून

सप्ताह महिने, कालगतीने
सरतच रहातात प्रमाण होऊन
जीवनाला सीमित करतात
नवीन वर्षाचे लेणे देऊन

येणे जाणे या साऱ्यांचे
ठेवलेय मी मनी साठवून
जगू पाहतेय प्रत्येक क्षण
परमेशा रे तुलाच आठवून

□

**पाऊ**

पाऊ रे पाऊ
नको ना सारखा येऊ

सुट्टी आहे शाळेला
नाही मिळत खाऊ
भिजल्यानी सारखे सारखे
होईल ना मग बाऊ

यायची मज्जा पाण्यातून
होडी लागता धावू
पण आता मात्र घरातून बाहेर
देतच नाही आई जाऊ

घरामध्ये बसून बसून
कंटाळा बघ लागला येऊ
थांब बाबा आता थोडा
म्हणतोय थोडे सुसाट धावू

नाहीत भेटत दोस्त मित्र

नि साधा शेजारचा भाऊ

सांग ना या साऱ्यांविना

एकटाच मी कसा राहू

□

# माहेर

खूप खूप दिवसांनी भेटले मला माहेर
चक्क त्यांनी केला, मला प्रेमाचाच आहेर

माहेर म्हणजे माया नि प्रेम म्हणजे ममता
नक्की जे लाभते ते, नाहीच येत सांगता

आईबाबा कधीचेच गेले
स्वर्गी जाऊन देवच बनले

वहिनी माझी साधी भोळी
मायेने भरली, तिच्या उदराची पोकळी

बंधू माझा थोर मनाचा नि उच्च तत्वांचा
राबता घरी आदरणीय साऱ्यांचा

जखडून ठेवतात सारे मायेचे पाश
खुणावते सदैव माहेरची आस

माहेर म्हणजे नक्की काय ?
नाहीच का याला अन्य अंतराय ?

जीवा जे लुभविते, मना जे सुखविते
मग ते सासर जरी असले तरी माहेरच भासते

□

## आस

करुणाघन हे करुणाई

स्नेहसुधा हे ममताई

विठाई गं विठाई ... विठाई गं विठाई

जगताच्या या भवसागरी

घनघोर तिमिर अंधारी

मी मार्गहीन मज तारी ... विठाई गं विठाई

मोहाचा अजब पसारा

मायेचा परिसर सारा

तव पायी दे मज थारा ... विठाई गं विठाई

मज ज्ञान नसे कशाचे

दृढ पाश अज्ञानाचे

तू उघड व्दार मोक्षाचे ... विठाई गं विठाई

वैकुंठ नसे मज ठावे

तव दर्शन नेत्रा व्हावे

रूप निर्गुण हृदयी ठसावे ... विठाई गं विठाई

ही ओढ अंतरासी

ही आस मम चित्तासी

हा देह वहावा तव पायी ... विठाई गं विठाई

□

## संचार

सोनुल्या माझ्या नंदना
ऐकिली प्रभूने प्रार्थना
सरल्या साऱ्या यातना
होई पूर्ण ही कामना

कधीही नाही चिंतिले
अहित मी कोणाचे
कधीही नाही लपविले
गूज मी मनीचे

अंतर हे जलाप्रती
प्रतिबिंब जणू मनाचे
चिंतन सदैव केले
त्या दयाघन प्रभूचे

तव परिश्रमांचा मेरू
कि विश्वासाचा तारू
कि बहरला हा कल्पतरू
तुज खुणावी विश्व संचारू

मज अन्य नको रे काही
तव नेत्रे विश्वा पाही
ये जिंकूनी सारी धरा ही
इतुके चिंती ही आई

□

## सासूबाई

अगं अगं सूनबाई
सांगायचे आहे तुला काही
आधी होते मी आई
तुझ्यामुळे झाले सासूबाई

पोटी माझ्या लेक नाही
म्हणून मला कोण घाई
मना मानसा ध्यास राही
पाहीन केव्हा सूनबाई

असंख्य कल्पना करून मनी
राहिले वागत प्रत्येक दिनी
फुलत चाललेल्या माझ्या सदनी
पाहून कृतार्थ झाले जीवनी

घर असावे सदैव हसरे
सुख नांदावे नित्य साजिरे
आनंदी पाहून तुमचे चेहरे
भरून पावती सारे सारे

आता इच्छा काहीच नाही
तुमचे कर्तृत्व देते ग्वाही
यशाची प्रभा वाढतच राही
आस अंतरी एवढीच तरीही

मत – मतांतरे सर्वत्रच असतात
म्हणून का कोणी इतरांना सांगतात
जे असेल ते रहावे आपल्याच घरात
इतकेच असते माझ्या मनात

काय कमी आहे सांगा ?
हवे असेल ते हक्काने मागा
सर्वांना रुचेल असेच वागा
सांभाळा सदैव प्रत्येकाचीच जागा

परस्परांचा राखावा मान
त्यानेच होतो स्वतःचा सन्मान
गोड शब्द बोला छान
त्यामुळेच लाभेल अढळ स्थान

घर आहे माझे तुमचे
एवढेच नव्हे, आपणा सर्वांचे
आपणच तर त्याला सजवायचे
अंतरीच्या आस्थेनी त्याला जपायचे

उदात्त हेतूनी मी काही म्हटले
तुम्हाला ते वेगळेच वाटले
देऊ सोडून चला झाले गेले
घडवू भविष्य नवीन वेगळे

मी आहे भूतकाळ पण तुम्ही आहात भविष्य
तुम्हासंगेच सजेल फुलेल पुढील सारे आयुष्य
सरेन मी मागे मागे, जायचंय तुम्हीच पुढे
हसत रहा, आनंदी रहा, हेच मागेन देवाकडे

□

## पाझर

ओठी हासू अन् नयनी आसू
जीवनाची हीच कथा
सुख दुःखाच्या मार्गावरती
जिवा जीवांची एक व्यथा

उंच भरारी स्मृती अंबरी
घेऊनी मग खग चाळवतो
व्यवहाराच्या तालावरती अन् नियतीच्या
सुरासुरातुनी गात सुस्वर निनादतो

तुझी नि माझी अखंड संगत
प्रीती सुखाची सुरेल रंगत
आठवताना तुला अंतरी
जीवच माझा आतुरतो

उत्सुकता ती तव भेटीची
जोड तयाला माधुर्याची
अंतरी अन् सामोरी रे
पाहुनी भावची पाझरतो

□

## शुभेच्छा

ही तर नांदी आयुष्याची
हीच सुरुवात तुझ्या यशाची
चिंता नको करू कशाची
कास धर केवळ परिश्रमांची

उज्ज्वल भवितव्यासाठी शुभकामना
उत्तुंग यशासाठी ईशाप्रत प्रार्थना
उल्हासित व्यक्तिमत्वास्तव भावना
उत्फुल्ल आयुष्याप्रत चेतना

लाभो तुला हवे ते सर्व काही
होवोत पूर्ण इच्छा सर्वही
यशवंत गुणवंत होण्या शुभेच्छाही
बस् एकच आस ही या हृदयी

जाणीव ठेव पालकांच्या कष्टाची
वाट धर सदैव सत्याची
प्रार्थना असो नित्य ईश्वराची
होईल प्राप्ती निःसंशय इच्छितांची

□

# सांत्वन

आयुष्य म्हणजे तरी काय ?
सुख – दुःखाची मिसळ
पण नाही करून चालत
सुखामध्ये दुःखाची भेसळ

मन प्रसन्न ठेवून आनंदाने
सुख जसे स्विकारायचे
का नाही त्याच सहजतेने
दुःखही मग पचवायचे ?

दिवस दुखासमाधानाचे
भुर्रकन पळतात
नि दुःखाला मात्र मागे
आठवायला का ठेवतात ?

आठवांच्या झुल्यावर
मन हिंदोळे घेते
नि क्षणार्धांत
सुख सरून दुःख येते

ज्याला हे सारे कळते
त्याने नाही रडायचे
जे जसे लाभलेय ना
तसेच्या तसे स्विकारायचे

स्वीकार करून वर्तमानाचा
असतो भूतकाळ विसरायचा
नवनवीन आशा फुलवत
घ्यायचा वेध भविष्याचा

□

## टिंगल

माणसाने या जगामध्ये कधी कोणा मानू नये आपले
कारण नकळत त्याला ते नाते जाते कापले

नित्य निळया नभांगणी रंग रहातात बदलत
नित्य नव्या दिनी तसे नाते जाते उलगडत

सहवासातून कळतात म्हणे मनाचे कंगोरे
तरीही का रहातात भाव मनीचे अधुरे ?

समजून घ्यायला स्वखेरीज इतरांना लागते मन विशाल
जे समजून घेऊच शकत नाहीत ते मात्र जगतात खुशाल

भाववेडे मन खुळे, झुरते रात्रंदिवस
पौर्णिमा साऱ्या जगाची, भाववेड्यांना मात्र अमावस

व्यवहारचतुर जगामध्ये त्यांनाच असतो थारा
जे जगतात सारे जीवन व्यवहाराच्याच आधारा

आपले म्हणून जगामध्ये त्यांनाच असतो थारा
जे जगतात सारे जीवन व्यवहाराच्याच आधारा

आपले म्हणून जगामध्ये मानूच नये कोणाला
समजावते मी दिवसातून हज्जारवेळा मनाला

हजारोवेळा समजावूनही लाखोवेळा चुकतो
अनुभवून दुष्ट जगाला हळहळत बसते

हळहळण्याखेरीज हाती असतेच काय अखेर ?
मन नाही दाखविता येत काढून कोणा बाहेर

तरीही सदैव चिंतीन मी, त्यांचेच मंगल
केली ज्यांनी मनाची माझ्या वेडे समजून टिंगल

टिंगल आणि टवाळी खरी नव्हे रे मना
कळेल का पण हे कधी सत्य साऱ्या जना ?

□

## बढती

खूप उन्कंठेने, खूप आतुरतेने
ज्याची होती वाट पाहिली
आज अखेर अचानकपणे
ती सुंदर सांज उगवली

जळीस्थळी, कष्टीपाषाणी
आस एकच मना लागली
वाट सदैव पहाण्याची
जिवा जणू खोडच जडली

आतूर मनाची हुरहूर सरली
बावऱ्या जिवाची ओढ निमाली
सुवार्ता ती कानी आली
मन खगाने भरारी मारली

देवघरात पंचारती उजळली
रोजच्या साखरेची गोडी वाढली
वेल प्रपंचाची मांडवावर चढली
गृहसौख्याची झळाळी वाढली

नकळत करांची अंजली जुळली
सुगंधित हारांनी फोटोफ्रेम सजली
अनाहूत आसवे नेत्री विसावली
दाटून मनात आठवण आली
सया – बायांनी विचारणा केली
का गं सखे अशी बावरली
मोठ्याने छोट्याला हाकाटी दिली
आईला आज बढती मिळाली,
“आपली आई आजी झाली ...!”

□

# क्षणिक

चढत्या रविसमान चढतच रहावे
कुसुमापरी फुलतची जावे
चंद्रिकेपरी विकसित व्हावे
जीवन माझे असे असावे

काळोखापरी अबोल नि मुग्ध
अग्निपरी रखरखित दग्ध
उन्हापरी रणरण दाहक शुद्ध
जीवन जणू असे महायुद्ध

रातराणीपरी मंद सुगंधित
वसंतापरी बहर सदोदित
बाल्यापरी निर्मळ आनंदित
जीवन असावे असे प्रमोदित

वायुपरी ते तरल असावे
निर्झरापरी गात वहावे
विहंगासम स्वच्छंद गमावे
जीवन ऐसे धुंद असावे

काव्यापरी गेय असावे
गीतासम सुस्वर गवसावे
दवबिंदुपरी क्षणिक असावे
अनाम क्षणी ते सरून जावे

□

# तुला सोडून

मी मात्र आले इथे, तुझ्याचसाठी सारे सोडून
तू मात्र गेलास कुठे, मला इथेच एकटी सोडून
क्षण क्षणात निघून जातात, आठवत रहाते पुन्हा पुन्हा
स्मृतिकुंजात नाहीच दुसरे, काही काही तुलाच सोडून
मधु – मधुर आठवातून व्हावेसे जागे वाटतच नाही
दूर दूर एकांतात वाटते बसावे सारेच सोडून
होते कसे क्षण ते आठवताही मोहोर येतो
बहर माझ्या मनाचा हा जाऊच नये मला सोडून
ठेवावे पकडून चिरंतन हे मनोगत माझे मोहक
दावू नये, सांगू नये, कोणालाही तुला सोडून
करू नये काही काही तुला सोडून, तुला सोडून
थांबावे हे विश्व अवघे माझ्याचसाठी, तुला सोडून
लाभावे हे जीवन सारे, उर्वरित माझे तुलाच
आयुष्यच तुझे झाल्यावर, जाईन कुठे तुला सोडून

□

# धमकी

स्वतः आनंदी राहून इतरांनाही प्रमुदित करणे
यालाच माझ्या मते, म्हणतात जगणे

मनामध्ये वादळ असेल तरीही सदैव हसतच रहाणे
मनातील सारे मळभ मनाममध्येच ठेवणे
आपल्यामुळे इतरांना ना किंचितही ताप देणे
हेच नव्हे का खऱ्या अर्थी, असली जीवन जगणे ?

आवडत नाही मुळीच मला, मुळूमुळू रडत रहाणे
केविलवाणे तोंड करून दुसऱ्यालाही दुःखी करणे
सभोवरचा सारे परिसर अकारण कलुषित करणे
हे कसले आलेय जिणे ? हे तर दरक्षणी स्वतःलाच मारणे

जगणे, जिणे, मरणे, मारणे
याला असतात असंख्य कारणे
जगायचे कसे आपण जिणे
हे असते आपल्या हाती स्वीकारणे

नको म्हणू अकारण गाते मी नित्य रडगाणे
मला ना ठावे रडणे, रडवणे, ठावे सदैव हसत रहाणे
असेच असेल तर पुन्हा पुन्हा ऐकवणे
सांगून ठेवते करीन मी मग बंदच बोलणे

□

## पिल्ली

पिल्ली माझी ही मोठी व्हायची
सोनी माझी ही मोठी व्हायची

किती किती कसे कसे सांगू तुला ?
समजावू कशी बाई माझ्या मना ?
दृष्ट तरी कशी काढायची ?

काल परवा तर होती रांगायची
दुडु दुडु पावलांनी दौडायची
सावली गं कश्शी आता मी धरायची ?

आकाशीच्या देवराया येई खाली
किर्ती, संपत्ती तू यांच्या लिही भाळी
कितीवेळा मी रे तुला विनवायची

गगनाचे पंख आता लेऊ का मी ?
अनिलाचा वारूवेग घेऊ का मी ?
कश्शी कश्शी यांच्या मागे मी पळायची ?

जारे राजा, सोन्या बाळा जाई पुढे
सप्तसमुद्र लंघुनी त्याही पुढे
वाट इथे नित्य अशी मी पहायची

□

# डोळे

तुझे डोळे सुंदर काळे
काजळ कोरल्यापरी
अनभिषिक्त राज्य करिती
सदैव माझ्या उरी

तुझे डोळे सुंदर काळे
श्रावण मेघापरी
सुखशांती बरसती
अविरत मजवरी

तुझे डोळे सुंदर काळे
यमुना डोहापरी
तुला न ठावे, खुलुनी दिसती
तव शामल तनुवरी

तुझे डोळे सुंदर काळे
प्रशांत सागरापरी
ठाव न लागे मजला त्यांचा
नित्य परिचित जरी

तुझे डोळे सुंदर काळे
भुरळ घालिती मना
वेड लाविती नित्य मजला
कसे कळावे जना ?
तुझे डोळे सुंदर काळे
आहेत जगावेगळे
सारे सारे भाव सामावलेत
साऱ्याहूनही आगळे

तुझे डोळे सुंदर काळे
ठसले माझ्या नेत्री
अणु अणु फुलविती
बहर पेरिती गात्री
तुझे डोळे सुंदर काळे
जेव्हा खिळली मजवरी
अंकित होऊन जाते तुझी
भुलूनच जाते पुरी

तुझे डोळे सुंदर काळे

सदैव तेवत राहोत

स्नेहदीप उजळत सदोदित

सुहास्य उधळत राहोत

□

# रसिक

तुझ्यासारखा रसिक जेव्हा मला भेटला
खरे सांगू का प्रिया ? माझा मलाच हेवा वाटला

ग्रीष्म माझ्या जीवनातील पुरा पुरा हटला
प्रीत वसंत नव्याने, उमलून बहरला

तुझ्या रूपाने मला, पूर्णरूप सखा भेटला
नि तना – मना जणू संजीवन मंत्रच गवसला

तुझ्यातील खट्याळ प्रेमळपणाच मला भावला
म्हणूनच उर्वरित जन्म, तुझ्याच हाती दिला

तू नी मी, द्वैत – अव्दैताचा प्रश्नच नाही उरला
सर्वार्थाने अनुरूप रसिक मला मिळाला

□

# शब्दवेडी

शब्दच आधार माझा, शब्द माझी संपत्ती
उधळावेत कुठे कुठे, कोणावर अन् किती ?

शब्दांचीच भुकेली मी शब्दच माझी प्रीती
शब्दांमुळेच झाली मला साऱ्या साऱ्याची प्राप्ती

शब्दच इमान माझे, शब्दच माझी निष्ठा
शब्दांमुळेच लाभली मला आजची ही प्रतिष्ठा

शब्दांसाठीच लढले – झगडले, शब्दांमुळेच हरले
शब्दांमुळेच जिंकले नि शब्दांवरच तरले

शब्दांसाठी बद्ध मी, याच का अनंत जन्मी
शब्दच देतात मला जगण्याची उर्मी

शब्दच माझे जीवन नि शब्दच माझे प्राण
शब्दच शस्त्र नि शब्दच शिरस्त्राण

शब्दांचीच मी गावी किती किती बरे महती
शब्दांवरच केली मी आजन्म प्रीती

शब्दच सखे माझे, शब्दच सोयरे
एकाकी जीवनाचे आधार बिचारे

शब्दप्रिया म्हणतात कोणी, कोणी शब्दवेडी
शब्दातच गवसते साऱ्या, विश्वाची गोडी

□

# संवाद

बहू स्नेहाने स्नुशेस पुसती झाले
गे, सांग सये, काय मनी तव आले ?

तो चांद कसा मुखकमली तव फुलला
कोण्या आगमने, पूर्णेंदु हा उमलला

मज नको सये, देऊ अशी शिक्षा
ही पुरे, पुरे झाली सत्व परीक्षा

गे सांग मला, सांग गडे लवलाही
सलज्जा ती हळुच तेधवा वदली,
तव वंशज गे मम उदरी वसतो आई

ऐकून अशी शुभवार्ता शुभवदनी
हो धन्य धन्य मी अन् धन्य अवघी अवनी

पहिले मासी हो सुलज्जा ती अंतरी
नकळे काही बस् देव पुजे मंदिरी

दुसरे मासी ना खावे काही वाटे
ते बाळरूप केवळ स्वप्नी भेटे

मासी तिसऱ्या स्वमायेला सांगावे
हवे नको, बस् तिजसीही मागावे

बघता बघता चौथ्याची सावली
मम बाळाची उदरी चाहूल जाणवली

पाचव्यामध्ये मागे मज ती काही
तो बाळकृष्ण, श्रीराम मला गे देई
फटकार प्रियाचा सहावा होऊनी आला
त्या बाळतनुचे वेड लागले मजला

सातव्यामध्ये नौकेतून विहरावे
गगनी खग होऊनी, क्षणात उंच उडावे

आठव्यामध्ये निद्रा गेली उडुनी
नवनिर्मितीची प्रभा फाकली वेदनी

नववा जणू नवरंगांची बहार
आयुष्य जणू सप्तसुरांची सतार

त्या बालतनुचे वेड लागले जिवा
मज दाखवी रे ते रूप दाखवी देवा

तो सुंदरदिन आज होऊनी आला
मातृत्वाचा नव साज चढवुनी गेला

मी कृतार्थ रे, सोन्या तुज प्रसवोनी
सुख गगनीचे, अवतरले मम सदनी

ही प्रतिकृती प्रिया तुझी तुज देते
पितृत्वाचे तेज तृप्त वदनी तव बघते

सलज्जा ती गोड तेधवा वदली
“तव वंशज गे तुजला देते आई...!”

□

# जीवनाचे सार

तू जणू रुपडे मोहक दहिवराचे
तू सुगंधत्वच सजीव मोगऱ्याचे
तू अस्तित्वच शीतल चंद्रिकेचे
तू अमरत्वच जगी प्रीतीचे

तू स्वप्नच जणू पहाटेचे
तू गीतच मम मनीचे
तू संगीत जीवनाचे
तू पूर्णत्वच रे प्राप्तीचे

तू चापल्य भासे मृगाचे
तू तेजच जणू रविकणांचे
तू दातृत्व रे पर्जन्याचे
तू बहररूपच वसंताचे

तू साफल्य मम अपेक्षांचे
तू सुयश साऱ्या परीक्षांचे
तू उत्तर अवघ्या प्रति क्षांचे
तू कारणच साऱ्या समीक्षांचे

तू दाहकत्व माझ्या एकलेपणाचे
तू पूर्णरूप माझ्या प्रपंचाचे
तू छत्र माझ्या लेकरांचे
तू अवघे सारच जीवनाचे

□

## स्नेहबंध

करते का गं कुणी, एवढे कधी कोणासाठी
अवघे जग धावत असता स्वार्थापोटी

ठेवतात नावे परस्परांना, ओढतात पाय पुढे जाता
उणेदुणे काढत राहतात कोसतात जाता – येता
आपमतलबी जगामध्ये तरीही जगतो कशासाठी ?

क्षण दोन क्षण भेटतो, का नाही परस्परांना हसवायचे ?
हसऱ्या स्मृती देऊन का नाही हसतच दूर व्हायचे
कारणे एवढी पुरे नाहीत का सांग जगण्यासाठी... ?

तुडुंब भरल्या जीवनातील ठरवायच्या चार प्रिय व्यक्ती
क्षणार्धात थांबेल तुजजवळ, समृद्ध माझी स्मृती शक्ती

उरल्या आयुष्यात कोण कसे भेटेल ठाऊक नाही
म्हणूनच या स्नेहबंधांची उतराई व्हावेसे वाटतच नाही

ऋण हे अनंत युगांचे वागवेन असेच अंतरी
जातील महिने, वर्षेही जातील, वाट पाहेन मी निरंतरी

असाच येईल एक दिवस, असेल जो तुझ्या भेटीसाठी
ऋणाईत ही एक वेडी जगत राहील त्याचसाठी

□

## कृतार्थ

आत्ता या क्षणी, झाला प्रसन्न जरी तो ईश्वर
नि म्हणाला बाळे, "माग हवा तो तुजला गे वर ...!"

देईन उत्तर क्षणार्धात हे विश्वचालका, विश्वपालका
टाकलेस देऊन तू हवे ते सारे, सारे या बालका

दिलीस दोन सद्गुणी बाळे, सुंदर हसरी आज्ञाधारक
यासम अमूल्य ठेवा, दुजा असेल का सांग जगन्नायक ?

बस्, ती आहेत तुझी नि तू ? तू तर माझा
मग सांभाळ तयांना म्हणून का मी अपमान करू तुझा ?

करतात हेवा सारीच, सारीच माझ्या भाग्याचा
धावा करते मी मात्र अहोरात्र तुझ्याच नामाचा

नको मला काही काही, हवे केवळ त्झे कृपाछत्र
संतुष्ट असेन मनी मानसी, राहीन राबत दिवसरात्र

एक तूच माझा म्हटल्यावर कमी काय रे मला ?

अर्पून टाकल्यात भावभावना, सारे सर्वस्वच मी तुला

□

## सोहळा

हा हसरा भावंडांचा मेळा
मुला नातवंडांचा गोकुळ गोतावळा
जिवा गुंतवून लावतो लळा
वेडा जीव होतो पुरेपूर खुळा

या लडिवाळ लेकीसुना
सुखावून सोडतात भाववेड्या मना
जखडून ठेवतात क्षणाक्षणा
भुलवून टाकतात सुखसंवेदना

गोड गहिरे हे माहेरीचे सुख
समावलेय ठासून सासरचे अप्रूप
टोचत रहाते बोचरी रुखरुख
दुरावलेल्यांची आठवण अरुप

खेद नाही व्यथा वेदनांचा
सोहळा हा केवळ आठवांचा
निव्वळ सुख देण्या नि घेण्याचा
साठव राहो निरंतर मायेचा

देऊन घेऊन पुरत नाही
प्रेम देता सरत नाही
क्षणिक सहवासे मन भरत नाही
हिशोब आठवांचा कधीच सरत नाही

द्याव्यात सुंदर सुंदर आठवणी
करावी दूर दुःखाची पाठवणी
नाही अन्य काहीच मागणी
बस् हीच केवळ विनवणी

□

# याचना

धन, द्रव्य, दारा नको मज काही
डोकावुनी पाही अंतरात
गिरी, कंदरी वा नको मंदिरीही
क्षण एक राही हृदयात

रत्ने, माणिके वा उंची पेहराव
नसे मज हाच ऐहिकाची
आस एक मज जिवा लागलीसे
प्राप्ती व्हावी तव प्रसादाची

माडी, बंगला वा नको गाडीघोडी
सुखी वसो गोडी तव नामाची
नको नको जिवा, सुखाचे देखावे
नेत्रांना दिसावे रूप तुझे

जीव शिणलासे व्याकुळ अंतर
खुणावतो आता पैलतीर
जन्म गेला फुका, वेडा मी पामर
अंतकाळी तरी कृपा कर

फेरा चुकवी रे जन्ममरणाचा
मज सोडवी रे देवराया
ध्यास मना लागे, लाभो तुझी छाया
आस एक हीच तव पाया

□

**मनु रे मनु**

मनु रे मनु, तुला काय म्हणू ?
अवखळ, चंचल वाराच जणू

मनु रे मनु मी तुला काय म्हणू ?
खळखळ हसणारा झराच जणू

मनु रे मनु, ए तुला काय म्हणू
सुंदर फुललेला गुलाबच जणू

मनु रे मनु, सांग तुला काय म्हणू
गोंडस, गोजिरा कान्हाच जणू

मनु रे मनु, सोन्या तुला काय म्हणू
छकुला, सोनुला माझा आशूच जणू

□

# सदाफुली

आठवतेय ती रात्र, ती काळरात्र
जिने ओढून नेला, माझा सखा सुहृदय सन्मित्र

अजूनही आठवतेय ती महाभयंकर निशा
जेव्हा करपून गेल्या, साऱ्या माझ्या आशा

सुंदर माझ्या विश्वाला अनाम उदासीने घासले
नि हसरे, नाचरे माझे विश्व, निराशेने वेढले

क्षणार्धांत नाहीसा झाला माझा जीवनाधार
पहाता पहाता बनले मी एकटी, एकाकी निराधार

बछड्यांना माझ्या पोरके करुनी गेली
सहचर माझा घेऊन, मला एकाकी करून गेली

पुढे येतच राहिले, असंख्य दिवस नि अनंत रात्री
रेटतच राहिले अपुरा डाव, एकरंगी एकपात्री

ठरवते नाही दावायचे अश्रू कधीच कोणाला
नाहीच आवरू शकत तरीही मी या दिनाला

करार होता तुझामाझा सदैव सदाफुलीचा
आजही पाळतेय मी नित्य निश्चये नेमीचा

□

# आर्जव

हे रामा, घनःशामा, पूर्ण पुरुष पुरुषोत्तमा
सुख निधान रघुनंदना, शांत करी रे या मना

जन्मुनी या संसारी, नाही उरले काही पदरी
वृथाची ही येरझारी, जन्ममृत्युची जाहली

अशांत हे चित्त माझे, जिणे जाहले अवघे ओझे
मुखी नाम येवो तुझे, तेही साधे सुचेना

अनंत शंका उठती मनी, चित्त जडावे तुझे चरणी
एक इतुकीच किसवणी, मान्य बापा करी रे

फुका गेला जन्म सारा, संसाराचा गूड पसारा
आवरीला आचरेना, बुद्धी तरी तू द्यावी

अहिल्येसी उद्धरिले, बालियासी ऋषित्व दिले
असंख्यासी त्वा तारीले, कृपा मजवरी करी

सोडवी रे येथुनी आता, निववी रे या चित्ता
तव पदप्राप्ती करिता, कृपा मला दाखवी

अभ्यासिण्या दासबोध, म्हणते घ्यावा आत्मबोध
करी रे अनुरोध, तत्काळ तू या क्षणी

□

# वांछित

सुंदर शुभेच्छा आजच्या दिवशी
प्रफुल्लित होवो, प्रसन्न पंचविशी

सतेज मुखकमली प्रभा विस्फरो
अप्रिय सारे सदा विस्मरो

सदोदित तुला प्रियतम लाभो
सुख दिगंत त्यायोगे भोगो

उत्तुंग यशाची भव्य दालने
पाचारो तुज आनंदाने

प्रपंचाच्या प्रथम प्रहरी
बरसात राहो सदैव सुखसरी

सुख भरलेल्या तव संसारी
आराम यशाची सजो साजिरी

वांछित ते ते तुज लाभावे

हेची आज मी मनी प्रार्थावे

□

## गे प्रिये

येताना सोडून तुला

काय वाटते मला

सांगू कसे कसे तुला ? गे प्रिये, गे प्रिये

क्षण क्षण वाटेल युगासमान

कसा घालवेन विरह काळ महान

करू कसे सोडून प्रयाण ? गे प्रिये, गे प्रिये

सहवास तुझा मदिर मदिर

स्मृती तुझी मधुर मधुर

मन माझे अधीर अधीर, गे प्रिये, गे प्रिये

जगायचे इथे तुझ्यावाचून

प्राप्त स्थितिचे जहर प्राशून

बस् तरीही आठवण, प्रतिक्षेतून, गे प्रिये गे प्रिये

नको करूस सये खंत

नक्कीच फुलेल प्रिये वसंत

होईल गंधीत सारा आसमंत, गे प्रिये गे प्रिये

□

## एक नजर

खरे नव्हे रे, न्हवे खरे, खरे नव्हे वाट पहाणे
मानतील भावना मनातच ठेवून मनीच झुरत बसणे

नाही एकवेळ आले, त्यात आहे काय एवढे
त्यामुळेच तर घडते सारे, कसे किती अन् केवढे

लागते हुरहूर जीवाला नसते माहीत का कारण
विचारांच्या थैमानाचे, सुरु डोक्यात रामायण

होतेय काय, घडतेय काय, हवे आहे तरी काय
चिडचिड होते साऱ्यावर, नाही सुचत काहीच उपाय

रात्र जाते तळमळत, जीव रहातो तडफडत
तरीही कान आतुरपणे, कानोसा घेतात धडपडत

जीव जिवामध्ये गुंतल्यावर, आणि कोठे सापडणार
पण वेड्या, अधीर मनाला, कसे नि कोण समजावणार

जीव, मन, चित्त साऱ्यांचे रूप एकच
साऱ्यांना या सुखवायला, एक नजर तू फेकच

□

# जीव

कळत नाही, एकेक दिवस खूप काही आठवते
बघता बघता साऱ्यांत असून, मलाच मी पारखी होते
स्मृतिमध्ये गतदिनांच्या, एवढी मी गुंग होते
सभोवार साऱ्या साऱ्यांचे, अस्तित्वही सरून जाते

इंद्रधनुच्या रंगांचे, मयुरपंखी अंगाचे
कस्तुरीच्या सुवासांचे नि चंदनाच्या परिमलाचे
रंगभरे, गंधभरे, अर्थभरे दिन ते
अविटशा गोडीचे नि मंतरलेल्या तुझ्या साथीचे

कुठे शोधू ? कसे शोधू ? भुर्रकन पळून गेले
घायाळ, भावविव्हळ करून मला एकटीलाच सोडून गेले
उरलेय मागे माझे कलेवर सांभाळतेय त्याला आजवर
अचेतन, प्राणहीन या तनुवर, सोडून गेला जीव, जो जडविला तुजवर

गेला जो जीव माझा होता, उरलाय माझ्यात तो तुझा
जो तुझ्याच प्रपंचात रमलाय, तुझ्याच मुलांमध्ये रमलाय
जे कधीही विचार नाही करत, कसाही कुठेही माझा

□

# शब्दबंध

साद घालुनी भावनांना, पदर पदर उलगडली
रज्जू जोडुनी मऊ सायीचे, नवी जोडली नाती
गोड गोड जणू अमृतापरी वा वीणेच्या झंकारापरी
सैर घडवीती कधी गगनावरी, मोहक ती माधुरी

येता दुःखाचे दारुण क्षण, व्यथित होते मृदू हळवे मन
आठव देऊनी अतीताचे क्षण, फुलविती मनी सुख ते कण कण
वा येवो जीवनी आपदा, जावो सोडुनी कधी संपदा
संग निभविती सदा सर्वदा, बनुनी सांगाती ते कितीदा

महती यांची काय वर्णू मी, मज लाभले जे या जन्मी
ऋणाईता मी तव आजन्मी, त्रिलोकीच्या स्वामी
स्नेहबंध हे आयुष्याचे, हृदयातळी जे जपावयाचे
बिंब जणू ते मृदूल मनाचे, भाव मंदिरी पुजावयाचे

बंध म्हणा वा यांना काही, वसती जिव्हाग्राचे ठायी
नित बद्ध हे अंतरातही, विनीत मी यांच्या पायी
युगे युगे ही आली गेली, अनंत हस्ते काव्ये घडली
ग्रंथसंपदा अगाध फुलली, अर्पण रसिकापायी

देण्याघेण्या परस्परांना, वा जपण्यास्तव तरल क्षणांना
आर्त भावना व्यक्तविताना, बहरविण्या शत आयुष्यांना
आत्मविकासा चेतविण्यास्तव, ऋणानुबंधा गुंफविण्यास्तव
स्नेहभावना फुलविण्यास्तव शब्दबंध हे असती

मना लाभविती, तना फुलविती, अणुरेणुला साद घालती
शब्दबंध हे असती, शब्दबंध हे असती
मऊ रेशीमास्तव भासली, कमलापरी कधी विकसित होती
भाव मनीचे मोती बनती, शब्दबंध माला गुंफिती

बंध तरल हे आयुष्याचे, रूप तरल हे मम आत्म्याचे
आत्म्याला परमात्मा सांगाती, शब्दबंध बांधिती, शब्दबंध बांधिती

□

# स्तवन

तुळजापुरावरी गं तुळजापुरावरी तुझे राज्य
साऱ्या विश्वावरी साम्राज्य || धृ ||

शालू भरजरी गं शेला जरतारीचा शोभतो
शिरी किरीट विराजितो ||१ ||

रत्नपाचूंचे गं हार कंठामध्ये रूळती
कर्णफुले कानी डुलत ||२||

हिरवा चुडा हाती गळा मंगळसूत्राचे मणी
मुखी तव नामाची गाणी ||३||

ओटी भरेन गं ओटी भरेन मी मोत्यांनी
आस भरून भक्तिची मनी ||४||

किती वर्णू तुला, किती वर्णू तुजसी गे माई
दीन दुर्बलांची तू आई ||५||

घेसी शस्त्र करी गे होता कुठे अन्याय
नित विनवितो गं तुज माय ||६||

संत योगीमुनी, राजे महाराजे गं तुझे दास
तव पायी देई मज वास ||७||

गुण गावे तुझे, गुण गावे तुझे गं येताजाता
नम्र विनवितो संगीता ||८||

साऱ्या विश्वावरी, साऱ्या जगावरी गं तुझी छाया
नत मस्तक तुझिये पाया ||९||

□

# आनंद

माझ्या अंगणात चिमणी नाचते
साळुंकी सोबती पारवेही
काऊ – माऊ येती दूधभातासाठी
सुप्रभाती भेटे जगजेठी

थंडगार वारा, तना उल्हसितो
फळाफुलांतून नित्य तो हासतो
भ्रमितो तो रवि सदैव आकाशी
प्रकाशिण्या साऱ्या जगासाठी

मंजुळ स्वरात खग गण गाती
संदेशही देती विश्वा साऱ्या
नदी, झरे सारे, नक्षत्र नि तारे
फुलविती साऱ्या अवनीला

उठता – बसता, कामही करिता
इथे तिथे दिसे सर्वव्यापी
सर्वा संभाळितो अनंत करांनी
चिंता या विश्वाची त्यासी आहे

हसत जगावे, मरून उरावे
ऐसेचि करावे, सदोदित
हाती नाही काही, केवळ आनंद
द्यावा अखंडीत, सर्वांप्रत

□

# नर्तन

सभोवारचे सारे विश्व, चिंतांनी आहे ग्रासलेले
सारे सारे आसमंत, प्रदूषणांनी व्यापलेले
सर्व दुष्ट राजकारण, अराजकांनी पूर्ण नासलेले
हे अवघे समाजजीवन, आतंकांनी गिळलेले

हवेय काय जगायला, सांग काय मागितलेले ?
सारेच तर स्वीकारलेय, जे मला तू दिलेले
आता काहीही नकोय, काहीही नाही चिंतलेले
बस कर सुसह्य हे, उर्वरित वार्धक्य दिलेले

दोन क्षण हळवे, भावनांनी ओथंबलेले
दोन बोल सुमधुर, स्नेहानी भारलेले
दोन कटाक्ष अर्थपूर्ण, सद्हेतूने दिलेले
दोन दिन स्मरणामधले, खरोखर मंतरलेले

सारे हे असूनही, चैतन्य मला दिसलेले
विश्वाचे या मांगल्य, क्षणार्धात गवसलेले
मोहक रुपडे परमेशाचे, अंतरी या वसलेले
आनंदाचे कारंजे जे, मनी माझ्याच फुललेले

जिथे मनमयुराचे नर्तन, नित्य सदोदित चाललेले
मनमुक्त लयीमध्ये मन माझेच रमलेले

□

## जो जो बाळा

जो जो बाळा, सुकुमार लडीबाळा
थांबव ना क्षणभर चाळा

दिनभर थकुनी, काऊ चिऊ बघ गेल्या
घरट्यांत जाऊनी निजल्या
गोमाता त्या लवलाही बघ आल्या
स्वगृही स्थिर बघ बसल्या

तो वाराही धावुनी धावुनी दमला
वेलीत क्षणिकही लपला
तो चंद्र नभी राज्य थाटुनी बसला
रवि मित्र सखा शांत शांत ही झाला

रे चिमण्या तू सांग मला लवलाही
त्या खेळाची नको करू ना घाई
हो शांत आता, शांत करी चित्ताही
दूर करी अपुल्या खेळा

ही माय तुझी संगणका सांगाती
रे फिरते ना या विश्वाच्या पाठी
तुजलाही रे जाणे उच्च पदासी
भोगिणे राज्य सत्तेसी
रे शांत करी श्रांत तुझ्या तनुगात्रा
मिटवुनी आपुला डोळा

□

## मेघांनो

सांगा, सांगा रे मेघांनो
सांगा सांगा पर्जन्याला
नको लपू माझ्या मागे
घाल स्नान धरित्रीला

सांगा सांगा गे कळयांनो
सांगा सांगा बहराला
नको बसू माझ्या आडे
देई जन्म सुगंधाला

सांगा सांगा त्या स्मितांना
सांगा सांगा अधरांना
नको मिटू माझ्या मागे
द्या ना वाट भावनांना

सांगा सांगा रे शब्दांनो
सांगा सांगा प्रेरणेला
नको अडू क्षण एक
निर्मू नवीन काव्याला

सांगा सांगा प्रत्येकाने
सांगा आपुल्या मनाला
नको अबोल राहू तू
फुलच आपुल्या जिवाला

□



संगीता कुलकर्णी

देण्याघेण्या परस्परांना, वा जपण्यास्तव तरल क्षणांना
आर्त भावना व्यक्तविताना, बहरविण्या शत आयुष्यांना
आत्मविकासा चेतविण्यास्तव, ऋणानुबंधा गुंफविण्यास्तव
स्नेहभावना फुलविण्यास्तव शब्दबंध हे असती ...!